# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

श्री सिध्दिविनायक

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.

दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२

ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org

वेबसाईट : www.siddhivinayak.org


## प्रथम मुदतवाढ

## दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

**विषय : श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासास सन २०२७ या वर्षाची दैनंदिनी छपाई करून देण्याबाबत.**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासास सन २०२७ या वर्षाची दैनंदिनी छपाई करून देण्याबाबत खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून विहित पध्दतीने मोहरबंद दरपत्रके मागविण्यात आली होते त्यात एकाच दरपत्रकधारकाने सहभाग घेतल्यामुळे प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| दरपत्रके प्रसिध्दीचा दिनांक | : | सोमवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ |
| दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक | : | बुधवार, दि.०७ ऑक्टोबर २०२६, सांय. ५ वाजेपर्यंत |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक | : | शुक्रवार, दि. ०९ ऑक्टोंबर २०२६, दु. २ वाजता |

अटी व शर्ती :

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशनाप्रमाणे (Specification) सन २०२७ या वर्षाची दैनंदिनी छपाई करून देण्याबाबत मोहरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

२) दरपत्रकधारकाकडून छपाई करण्यात येणाऱ्या दैनंदिनीचा दर्जा उत्तम असावा. या संदर्भात पाहाणी करण्यासाठी न्यासाकडून मागील वर्षाची दैनंदिनी दरपत्रकधारकास उपलब्ध करून देण्यात येईल.

३) दरपत्रकधारकाने ३ वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे सादर करावी. तसेच दरपत्रकधारकाचे कार्यालय न्यास कार्यालयापासून किमान ५० किमी अंतरावर असणे आवश्यक आहे.

४) सन २०२७ या वर्षाची दैनंदिनी छपाई करून देण्याबाबत कार्यादेश व आर्टवर्क प्राप्त झाल्यापासून २१ दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील.

५) पुरवठादाराने काम पूर्ण केल्यावर न्यासास बिल सादर करताना बिलामध्ये पॅन कार्ड/जीएसटी क्रमांक व कंपनीच्या बँकेचा तपशील नमूद करावा.

६) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) सेवाकर जी.एस.टी नोंदणी / ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी कार्ड (पॅन कार्ड)

ड) दैनंदिनी छपाई क्षेत्रातील किमान तीन वर्षाचा अनुभव असल्याचे दर्शविणारी कागदपत्रे.(कार्यादेश, पुरवठा आदेश, बिलाच्या प्रती यापैकी एक )

इ) पुरवठादाराची सरासरी वार्षिक उलाढाल किमान २.५० लक्ष असल्याचे (सी.ए) प्रमाणपत्र.

७) दरपत्रक भरतांना कर वगळून रक्कम भरावी. दरपत्रकामध्ये कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही.

८) नियमानुसार आवश्यक कर कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करण्याची जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील.

९) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

१०) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

११) आर्टवर्क उपलब्ध झाल्यानंतर निर्धारित वेळेत दैनंदिनी छपाई करून न दिल्यास न्यासाच्या स्तरावरून दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच बॉक्स सह दैनंदिनी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील व त्यानुसार दरपत्रक भरावेत.

१२) सन २०२७ या वर्षाची दैनंदिनी छपाई संबधी कोणत्याही प्रकारच्या माहितीची आवश्यकता असल्यास श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी कार्यालयात दूरध्वनी क्र.०२२–६२४९११६० वर संपर्क साधावा.

१३) उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल/ सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. पुरवठादारकाची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

१५) दरपत्रकधारकाने अे ४ साईज लिफाफा देताना तांत्रिक दरपत्रक व मुल्य दरपत्रक तपशिल याप्रमाणे दोन वेगवेगळया लिफाफामध्ये भरुन त्यावर संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक त्यावर लिहून, लाखेने सिलबंद करून न्यास कार्यालयात जमा करावे.

(राखी चव्हाण)
कार्यकारी अधिकारी